दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १९१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.११ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## उरणमध्ये धारदार शस्त्राने तरुणावर वार

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण एस टी बस डेपो जवळ ताहा गुलजार शेख या तरुणांवर धारदार शस्त्राने वार करण्याची घटना उरण पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. उरण पोलीसांनी हल्लेखोरांना ताब्यात घेतले आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार उरण शहरात राहणाऱ्या ताहा गुलजार शेख व रुपेश ललना प्रसाद रा.बेलपाडा या दोघांमध्ये दोन दिवसांपूर्वी उरण मधिल पेट्रोल पंपावर शाब्दिक बाचाबाची झाली होती. याचा राग अंगी बाळगुन रुपेश ललना प्रसाद व त्याचा साथीदार यांनी रविवारी (दि९) संध्याकाळी ठिक ८ च्या सुमारास ताहा गुलजार शेख यास उरण एस टी बस डेपो गाठून आपल्या जवळील धारदार शस्त्राने मानेवर वार केले. आणि अंधाराचा फायदा उठवत पोबारा केला. या घटनेची माहिती उरण पोलिसांना मिळताच त्यांनी सदर हल्ल्यासंदर्भात गुन्हा दाखल करुन हल्लेखोरांच्या मुसक्या आवळल्या आहेत. सदर गुन्ह्या संदर्भात उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस ठाण्याचे अधिकारी अधिक तपास करत आहेत.

# समाजवादी पक्षाचे संस्थापक मुलायमसिंह यादव यांचे निधन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

समाजवादी पक्षाचे संस्थापक आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री मुलायम सिंह यादव यांचे निधन झाले आहे. दिल्लीच्या मेदांता रुग्णालयात त्यांनी ८ वाजून १६ मिनिटांनी अखेरचा श्वास घेतला. ते ८२ वर्षांचे होते. २२ ऑगस्ट रोजी मुलायम सिंह यादव यांना रक्तदाबाच्या समस्येमुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेव्हापासून मुलायमसिंह यांची प्रकृती सातत्याने खालावत गेली आणि आज सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. उत्तर प्रदेशात त्यांना नेताजी या नावानं ओळखले जात असे.



मुलायम सिंह यादव यंनी समाजवादी पार्टीची स्थापना केली होती. २०१९ मध्ये ते मैनपुरी लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आले होते. मुलायम सिंह यांच्या पत्नी साधना गुप्ता यांचं जुलै महिन्यात निधन झालं होतं. तर, पहिल्या पत्नी मालती देवी यांचं २००३ मध्ये निधन झालं होतं. मुलायम सिंह यादव यांचा जन्म २२ नोव्हेंबर १९३९ रोजी झाला होता.

मुलायम सिंह हे तरुणपणी कुस्ती खेळायचे. त्यांनी काही काळ कुस्तीचे मैदानही गाजवले. यानंतर मुलायमसिंह यादव यांनी काहीकाळ प्राध्यापक म्हणून काम केले.

यानंतर आपले राजकीय गुरू नत्थू सिंह यांच्या सानिध्यात आल्यानंतर मुलायमसिंह यादव यांनी जसवंतनगर विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात पहिले पाऊल ठेवले. १९६७ साली ते पहिल्यांदा आमदार झाले. १९८२ ते १९८५ या काळात ते विधानपरिषदेचे सदस्य होते.

मुलायम सिंह यादव हे लोहिया आंदोलनात हिरीरीने सहभागी झालेल्या तरुण नेत्यांपैकी एक होते. ४ ऑक्टोबर १९९२ रोजी मुलायम सिंह यादव यांनी समाजवादी पक्षाची स्थापना केली. त्यानंतर मुलायम सिंह यादव आपल्या प्रतिस्पर्ध्यांना एकापाठोपाठ एक करून धूळ चारत गेले. ते आठवेळा उत्तर प्रदेश विधानसभेवर निवडून गेले होते. मुलायम सिंह यादव यांना तीनवेळा उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदी बसण्याचा मान मिळाला. तसेच त्यांनी केंद्र सरकारमध्ये संरक्षण खात्यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या खात्याचे मंत्रिपद भुषविले होते.

## ठाकरे गटाला 'मशाल' चिन्ह

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**निवडणूक आयोगाकडून शिवसेना पक्षाचं नाव आणि निवडणूक चिन्ह गोठवण्यात आलं होतं. त्यानंतर शिंदे आणि ठाकरे गटाकडून निवडणूक आयोगाकडे पक्षाचं नाव आणि निवडणूक चिन्हासाठी तीन पर्याय देण्यास सांगण्यात आलं होते. दोन्ही गटाकडून त्यादृष्टीनं प्रत्येकी तीन पर्याय सुचविण्यात आले होते. आता निवडणूक आयोगानं आपला निकाल जाहीर केला आहे. यात ठाकरे गटाला 'मशाल' चिन्ह देण्यात आलं आहे. तर शिंदे गटाला नव्याने तीन चिन्हाचे पर्याय देण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे सध्यातरी शिंदे गटाला निवडणूक आयोगानं कोणतंही चिन्ह दिलेलं नाही.**

गेल्या आठवड्याभरापासून शिवसेनेच्या निवडणूक चिन्ह असलेल्या धनुष्यबाणासाठीची लढाई ठाकरे आणि शिंदे गटात सुरू होती. निवडणूक आयोगानं यावर मोठा निर्णय घेत शिवसेना पक्षाच्या नावाच्या वापरास बंदीचा आणि धनुष्यबाण निशाणी गोठविण्याचा अंतरिम आदेश जाहीर केला. त्यानंतर दोन्ही गटांना पक्षाचं नाव आणि चिन्हासाठी प्रत्येकी तीन पर्याय देण्यास सांगण्यात आलं होतं.

ठाकरे गटाकडून निवडणूक चिन्हासाठी धगधगती मशाल, उगवता सूर्य आणि त्रिशूळ हे तीन पर्याय देण्यात आले होते. पण त्रिशूळ हे धार्मिक चिन्ह असल्यानं सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार हे चिन्ह देता येणार नाही, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. तर उगवता सूर्य हे निवडणूक चिन्ह याआधीच डीएमके पक्षाचं आहे. त्यामुळे हेही चिन्ह फेटाळून लावण्यात आलं. तर ठाकरे गटानं सुचवलेला तिसरा पर्याय म्हणजेच मशाल चिन्हाला निवडणूक आयोगानं परवानगी दिली आहे.

दुसरीकडे शिंदे गटानंही ठाकरे गटावर कुरघोडी करत त्रिशुळ, उगवता सूर्य आणि गदा हे तीन पर्याय सूचविण्यात आले होते. शिंदे गटाचे हे तिनही पर्याय निवडणूक आयोगानं फेटाळून लावले आहेत. शिंदे गटाला पुन्हा एकदा निवडणूक चिन्हाचे पर्याय सादर करण्याची संधी दिली आहे.

### ठाकरे आणि शिंदे गटाला नावही मिळाले

ठाकरे गटाला 'शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे' हे नाव देण्यास निवडणूक आयोगानं परवानगी दिली आहे. तर शिंदे गटाला निवडणूक आयोगानं 'बाळासाहेबांची शिवसेना' हे नाव वापरण्यास हिरवा कंदील दाखवला आहे. दोन्ही पक्षाकडून पक्षाच्या नावासाठी प्रत्येकी तीन पर्याय देण्यात आले होते.

शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे

## एटीएम मध्ये कॅश लावणाऱ्या एजन्सीच्या कर्मचाऱ्यांनी केला ४१,६२,५००/- रुपयांचा अपहार

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यात एक अजब घटना घडली आहे. बँकांच्या एटीएम मशीन मध्ये कॅश लावणाऱ्या एजन्सीच्या माणसांनी कॅश लावण्याचा खोटा बनाव करून तब्बल ४१, ६२, ५००/- रुपयांचा अपहार केल्याची घटना घडली आहे. बहुतांश बँका या एटीएम मध्ये कॅश लावण्याचे काम अन्य एजन्सीकडे देत असतात. एटीएम मशीन मधील कॅश संपत आल्यानंतर सदर एजन्सीला कळवल्यानंतर एजन्सीची गाडी कॅश लावण्यासाठी प्रत्येक बँकेच्या एटीएम जवळ येते व ठराविक रक्कम त्या ठिकाणी मशीन मध्ये लावून त्याच्या नोंदी करून निघून जाते. असाच प्रकार श्रीवर्धन तालुक्यातील श्रीवर्धन शहरातील एचडीएफसी बँक शाखा व श्रीवर्धन तालुक्यातील बोरली पंचतन येथील एचडीएफसी बँक शाखा यांच्या एटीएम मध्ये झालेला आहे.

२३/ ९/ २०२२ ते २६/ ९/ २०२२ या काळामध्ये कॅश लावणाऱ्या एजन्सीजच्या कर्मचाऱ्यांनी त्याचा अपहार केल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी ७/१०/ २०२२ रोजी रात्री उशिरा अकरा वाजता श्रीवर्धन पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सिक्युर व्हॅल्यू इंडिया लिमिटेड या मुंबई भांडुप येथील कॅश लावणाऱ्या एजन्सीचे कर्मचारी निखिल महादेव नाडकर राहणार नागाव, माण-गाव. व अनिकेत विजय सापटे, राहणार बोरले, तालुका माणगाव, या दोन आरोपींना श्रीवर्धन पोलिसांनी कॅश अपहार केल्याप्रकरणी अटक केली आहे. सदर कॅशचा अपहार झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादी हरेश वसंत वाघमारे, वय ४०, राहणार तळेगाव, माणगाव यांनी श्रीवर्धन पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दिली होती.

याप्रकरणी श्रीवर्धन पोलीस ठाण्यातील हवालदार एस. जी.गुरव यांनी गुन्हा दाखल केला. गुन्हा रजिस्टर क्रमांक १२८ /२०२२ भा.द.वि. कलम ४२०, ४०८,

…/२

**महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस सचिव व ह.भ.प.दामाजी गणपत गोवारी शाळेचे संस्थापक/अध्यक्ष**

## सुरदास गोवारी यांनी दिला मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वीरशैव कक्कय्या (ढोर) समाज मंडळ, कामोठे आयोजित भव्य वधू-वर पालक स्नेहवर्धक परिचय मेळाव्यास (२०२२) महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस सचिव व ह. भ. प. दामाजी गणपत गोवारी शाळेचे संस्थापक/अध्यक्ष सुरदास (दादा) गोवारी यांनी १०,०००/- रूपये देणगी दिली.



वीरशैव कक्कय्या (ढोर) समाज मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी सुरदास (दादा) गोवारी यांचे आभार मानले. यावेळी पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष अजिनाथ सावंत, संस्थेचे अध्यक्ष मल्हारी सदाफुले, सचिव चंद्रकांत पोळ, उपाध्यक्ष रमेश सोनवणे व कार्यकारिणी सदस्य श्रीकांत शिंदे, विलास खरटमोल उपस्थित होते.

## माणगांव पोलीसांनी रक्तचंदन सदृश लाकडांचा साठा जप्त

### माणगाव पोलिसांची पुष्पा फिल्मी स्टाईल कारवाई ; ३ आरोपी पकडले

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव पोलिसांनी पुष्पा फिल्मी स्टाईलने कारवाई करत माणगाव तालुक्यातील इंदापूर विभागातून सुमारे ४० किलो रक्तचंदनसदृश पकडले आहे. लाकडाची तस्करी होणार असल्याची खबर माणगाव पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांना गोपनीय सूत्रांनुसार लागली असल्याने त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सतिष आस्वर, पोलीस उप निरीक्षक के. ये. गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक अस्मिता पाटील यांच्या मार्गदशनाखाली माणगाव पोलीस टीम पोलिस हवालदार रावसाहेब कोळेकर, पोलीस हवालदार दर्शन दोडकुळकर, पो. शि. शामसुंदर शिंदे, पो शि. रामनाथ डोईफोडे, गोविंद तलवारे, अमोल पोंधे, दिपाली मोरे माणगांव वनविभाग वनक्षेत्रपाल अनिरुद्ध ढगे व त्यांची टीम यांनी कारवाई केली.



यामध्ये ३ आरोपी सुनील प्रेमचंद पटवा रा. सात रस्ता मुंबई, शरीफ खान वय वर्षे २५ रा. उत्तरप्रदेश, इम्रान शेख सात रस्ता मुंबई हे निजामपूर वरून सुमारे ३८ ते ४० किलो रक्तचंदन सदृश्य लाकडाचा साठा घेऊन वॅगनार कार क्रमांक एम एच ०३ बी सी ३५९८ ही कार घेऊन मुंबई येथून आले होते. त्यांची खबर माणगाव पोलिसांना मिळताच माणगाव पोलीस टीमने सापळा रचून त्यांना माणगाव निजामपूर रोडवरील खर्डी बुद्रुक येथील गारवा हॉटेल जवळ पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र तस्करानी तिथून पलायन केले. माणगाव पोलिसांनी शिताफीने रचलेल्या सापळ्यात ह्या तस्करांना माणगाव पोलिसांनी इंदापूर येथे पुष्पा स्टाईलने पाठलाग करून पकडले आहे.

आरोपींकडून मुद्देमाल जप्त केल्यानंतर पुढील तपास माणगाव पोलीस व माणगाव वनविभाग यांच्याकडून संयुक्तिकरित्या सुरू आहे. तपसाअंती आरोपींवर भारतीय वन अधिनियम १९२७ च्या कलमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती देखील वनक्षेत्रपाल अनिरुद्ध ढगे यांनी पत्रकारांना दिली आहे.

## उरण वायु विद्युत केंद्रातील दुर्घटनेत विष्णू पाटील कामगाराचा मृत्यू

### संतप्त ग्रामस्थांची गेटवर धडक



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित ( वायु विद्युत केंद्र) उरण या प्रकल्पात घडलेल्या स्फोटाच्या दुर्घटनेत प्रकल्पातील बॉयलर प्रमुख प्रभारी विवेक धुमाळे यांचा जागीच मृत्यू झाला होता. तर प्रकल्पातील दुर्घटनेत गंभीर रित्या जखमी झालेले कंत्राटी कामगार विष्णू यशवंत पाटील यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. सदरची दुर्घटना रविवारी सुट्टीच्या दिवशी घडली, नाहीतर मोठ्या प्रमाणात जीवित हानी झाली असती असे कामगारांकडून सांगण्यात येत आहे. या दुर्घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी व मयत कामगारांच्या वारसांना कायमस्वरूपी नोकरी आणि ५० लाख रुपये भरपाई मिळावी यासाठी संतप्त ग्रामस्थांनी गेटवर धडक दिली आहे

वायु विद्युत केंद्र ( वेस्ट हिट रिकव्हरी प्लांट) उरण मध्ये गॅस टर्बाईन-८ हे युनिट १२० मेगावाट लोडसह सेवेत असताना रविवारी ( दि.९) दु १२:३० वाजता अचानक त्यात तांत्रिक दोष उदभवून उच्च दाबाच्या बूस्टर पंपामधून गळती झाली. सदर प्रसंगी तिथे नजीक नियमित तपासणीसाठी कार्यरत असलेले बॉयलर प्रमुख प्रभारी- विवेक धुमाळे, बॉयलर तंत्रज्ञ- के.के. पाटील आणि कंत्राटी मदतनीस- विष्णू यशवंत पाटील हे तिघेही दुर्दैवाने या आकस्मिक अपघातात उच्च दाबाच्या वाफेमुळे या अपघातात गंभीररीत्या

…/२

## रविवारी खांदा कॉलनीत मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषधे वाटप महाशिबीर

### अपंगांना तीन चाकी सायकल, नेत्र तपासणी व चष्मे वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ पनवेल, भारतीय जनता पार्टी पनवेल आणि रायगड मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १६ ऑक्टोबर रोजी खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयात मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार वाटप महाशिबीर आयोजित करण्यात आले आहे.

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती या सेवा पंधरवड्यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. या अंतर्गत हे महाशिबीर होणार आहे. या महाशिबिराच्या अनुषंगाने प्राथमिक तपासणी शिबीर नुकताच पार पडले असून महाशिबीर येत्या रविवारी खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयात सकाळी ०९ ते सायंकाळी ०४ वाजेपर्यंत होणार आहे. या महाशिबिरात सर्वसाधारण रोग, महिलांचे आजार, हृदयरोग, हाडांचे रोग, मधुमेह, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, बालरोग, त्वचा व गुप्तरोग तपासणी, दंतरोग तपासणी, नाक-कान-घसा, सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या, ईसीजी तपासणी, कॅन्सर तपासणी, क्षयरोग तपासणी आणि औषधोपचार मोफत देण्यात येणार आहे. त्याचबरोबर ० ते १८ वयोगटापर्यंत २डी इको तपासणी आणि हृदय शस्त्रक्रिया, डोळ्यांची तपासणी व चष्मे वाटप, तसेच अपंगांना तीन चाकी सायकल वाटप, कर्णबधिरांना श्रवणयंत्र, देण्याबरोबरच मोफत कृत्रिम हात व पाय अर्थात जयपूर फूट बसविण्याचे शिबीरही यावेळी होणार आहे. यावेळी आयुष्यमान भारत डिजिटल कार्ड सुद्धा या शिबिरात तयार करून देण्यात येणार आहेत. तसेच दिव्यांगांना प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहे. या महाशिबिरात साधु वासवानी मिशन पुणे, लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट, एमजीएम हॉस्पिटल कामोठे व

…/२

# ‘प्रचंड’ सीमोल्लंघन

भारतीय हवाई दलात ‘प्रचंड’ ही भारतीय बनावटीची हलकी लढाऊ हेलिकॉप्टर्स तैनात झाल्यामुळे भारताच्या सैन्यदलांच्या ताकदीमध्ये मोठी भर पडली आहे. ‘हिंदुस्थान एरोनॉटिक्स’चे हे लक्षणीय यश आहे. कारगिल युद्ध भारताने जिंकले होते आणि पाकिस्तानचा निर्णायक पराभव केला होता. मात्र, तेव्हाच सर्व प्रकारच्या हवामान आणि प्रदेशांमध्ये काम करू शकणारी लढाऊ हेलिकॉप्टर्स आपल्याकडे नाहीत, याची जाणीव संरक्षण दलांमधील नेतृत्वाला झाली होती. या हेलिकॉप्टरचे नाव ‘प्रचंड’ असले तरी ते चपळ, तुलनेने कमी वजनाचे आणि वेगवान आहे. आत्ता १५ हेलिकॉप्टरांची पहिली तुकडी सज्ज झाली असून त्यातील दहा भारतीय हवाई दलाला तर पाच भूदल म्हणजे आर्मीला मिळणार आहेत. ‘प्रचंड’ हेलिकॉप्टच्या निर्मितीची योजना मोठी असून अजून सव्वाशे ते दीडशे हेलिकॉप्टर्स बनणार आहेत. ती जसजशी तयार होत जातील; तसतशी दूरसंवेदन व इतर क्षेत्रातील प्रगतीचे टप्पे त्यांच्यात सामावून घेतले जातीलच. आज या हेलिकॉप्टरमधील ४५ टक्के सामग्री शंभर टक्के भारतीय बनावटीची आहे. काही काळातच ही टक्केवारी ५५ वर जाईल. हेलिकॉप्टर किंवा विमानांमधील सुटे भाग परदेशी बनावटीचे असले तरी काही बिघडत नाही. त्यांची बांधणी ही भारताच्या गरजांनुसार आणि भारतीय तंत्रवैज्ञानिकांच्या देखरेखीखाली होणे महत्त्वाचे असते. तशी ती झाली आहे. आता ‘प्रचंड’ हिमालयातील अतिशीत व अतिउंच भूभागांपासून राजस्थानातील अतिउष्ण प्रांतापर्यंत सर्वत्र सारख्याच ताकदीने काम करू शकेल. मुख्य म्हणजे, या हेलिकॉप्टरमधून क्षेपणास्त्रे डागता येतील. गेल्या काही वर्षांमध्ये जगात ‘ड्रोन’ वापरून हल्ले करण्याची युक्ती केवळ देशांची सैन्यदलेच नव्हे तर दहशतवादी संघटनाही वापरत आहेत. हवेतून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे किंवा असे ड्रोनहल्ले रोखण्याची किंवा परतविण्याची क्षमता ‘प्रचंड’मध्ये आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. भारतीय संरक्षणसज्ज्ता आता केवळ पश्चिमेकडे पाहून ठरवता येत नाही. किंबहुना, ‘पहा जरा पूर्वेकडे’ असे म्हणतच तीनही दलांची सज्ज्ता वाढवावी लागत आहे. ‘प्रचंड’ची संकल्पना प्रथम मांडण्यात आली; तेव्हापासून ती प्रत्यक्ष रणांगणात तैनात होण्यामध्ये फार मोठा कालावधी गेला आहे. मात्र, आत्ता ती सेवेत रुजू होण्याआधी त्यांच्या सर्वांगीण चाचण्या लडाखमध्ये घेण्यात आल्या आहेत, ही दिलासा देणारी बाब आहे.‘प्रचंड’ तैनात करताना झालेल्या समारंभात संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी पंतप्रधान मोदी यांनी संरक्षण सज्ज्तेमधील स्वदेशीला दिलेल्या प्रोत्साहनाचा उल्लेख केला. तो केवळ औपचारिक नव्हता. भारतीय सैन्यदलांच्या शस्त्रास्त्रांच्या गरजा आणि त्यांची परिपूर्ती याकडे अनेक कारणांनी दीर्घकाळ दुर्लक्ष झाले होते. मोदी सरकारचे पहिले संरक्षणमंत्री दिवंगत मनोहर पर्रीकर यांनी खात्याचे काम सुरू केले तेव्हा त्यांना पहिला धक्का या अपुऱ्या तयारीचा बसला होता. यात आयात होणाऱ्या शस्त्रास्त्रांचा किंवा विमानांचा तुटवडा होता; तसेच, अनेक स्वदेशी प्रकल्पांनाही खीळ बसली होती. त्यांना चालना देणे, हे मोठे आव्हान होते आणि आजही आहे. आजही भारतीय हवाई दलाकडे त्यांच्या गरजेइतकी लढाऊ विमाने अथवा हेलिकॉप्टर्स नाहीत. इतर दोन दलांचीही स्थिती वेगळी नाही. त्यातल्या त्यात सध्या नौदलाची स्थिती बरी आहे. अलीकडेच, आयएनएस विक्रांतचे जलावतरण झाले. मात्र, हवाई दलाकडे नजर टाकली तर आज किमान चारशे ते साडे चारशे प्रशिक्षित वैमानिकांची कमतरता आहे, असे संरक्षण तज्ज्ञांचे मत आहे. हा आकडा छोटा नाही. लढाऊ विमाने किंवा हेलिकॉप्टर्स यांच्या वैमानिकांचे प्रशिक्षण केवळ वेळखाऊ नव्हे तर इतर अनेक अर्थांनी आव्हानात्मक असते. हवाई दलात नवी विमाने किंवा हेलिकॉप्टर्स येत असताना पुरेशा संख्येने वैमानिकच तयार होत नसतील, तर ती चिंताजनक बाब आहे. आता दहा हेलिकॉप्टर्सची एक तुकडी म्हणजे स्क्वाड्रन अशा ‘प्रचंड’च्या सात तुकड्या तयार व्हाव्यात, अशी योजना आहे. या हेलिकॉप्टरचे पहिले चाचणी उड्डाण दहा वर्षांपूर्वी यशस्वी झाले, तेव्हा भारत हे हेलिकॉप्टर स्वत:च्या ताकदीवर बांधू तसेच रणांगणात उतरवू शकेल, याची खात्री जगाला पटली. त्यानंतर, आफ्रिका खंडातील काही देशांनी हे हेलिकॉप्टर भारताकडून विकत घेण्याचीही तयारी दाखविल्याचे सांगण्यात येते. अर्थात, मायदेशातील मागणी आणि निर्यात ही दोन्ही उद्दिष्टे हिंदुस्थान एरोनॉटिक्स किती वेगाने साध्य करते, हे भविष्यात दिसेलच. भारताने आण्विक सज्ज्तेबाबत जी गती आणि स्वावलंबन दाखविले; तसे स्वावलंबन हेलिकॉप्टर, विमाने, अत्याधुनिक तोफा, रणगाडे यांच्या बांधणीत आपण दाखवू शकलो नाही. आज आपली शस्त्रनिर्यात वाढली असली तरी आयातही वाढतेच आहे. युद्धविषयक विज्ञान व तंत्रज्ञानातही आपण चौफेर यश मिळविलेले नाही. मात्र, तो अध्याय मागे टाकून आता पुढे जावे लागेल. ‘प्रचंड’च्या यशस्वी उड्डाणामुळे स्वावलंबनाकडे नेणारे सीमोल्लंघन होत आहे, ही समाधानाची बाब आहे.

# उरण तालुक्यात पशुसंवर्धन विभागामार्फत पाळीव गुरांना लम्पि रोगमुक्तीसाठी लसीकरण मोहीम

**दै.रायगड नगरी । उरण**

राज्यातील विविध जिल्ह्यात गोधनाच्या जीवावर उठलेल्या लम्पी आजाराबाबत रायगड जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागाने सतर्कता दाखविली असून, जिल्ह्यातील पाळीव गुरांच्या संरक्षणासाठी लसीकरण मोहीम हाती घेण्यात आली आहे. उरण तालुक्यात येणाऱ्या गाव आणि वाड्या वस्त्यांवरील गोवर्ग जनावरांना पशु संवर्धन विभागामार्फत लसीकरण करण्यात येत आहे. दरम्यान तालुक्यात झालेल्या संरक्षणात अजून तरी एकही लम्पी चर्मरोगाने बाधित जनावरे आढळून आली नाहीत.

तरीही खबरदारीची उपाययोजना म्हणून मोठ्या संख्येने जनावरे असलेल्या गावात पशुसंवर्धन विभागाकडून लसीकरण मोहीम सुरू केली असल्याचे, उरणचे पशुधन विकास अधिकारी डॉ. अनिल धांडे यांनी स्पष्ट केले आहे. तालुक्यात सद्यस्थितीत शासनाकडून मिळालेल्या लसी पैकी मार्गदर्शक सूचनेनुसार जवळ–जवळ शंभर टक्के लसीकरण पूर्ण झाले आहे. यात रस्त्यावर मोकाट फिरणाऱ्या गोवर्ग जनावरांनाही लम्पी चर्म रोगाची लस देण्यात आली आहे.

दरम्यान तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या माध्यमातून ,डॉ.एस.डी डाबेराव यांनी चिरनेर परिसरातील १ हजार १६१ गोवर्ग जनावरांचे लसीकरण केले .तर डॉ. महेश शिंदे यांनी विंधणे परिसरात २९७ गोवर्ग जनावरांना लम्पी चर्म रोगाची लस दिली. तसेच जासई येथील डॉ. महेश सावंत यांनी ५४२ गुरांचे लसीकरण केले. उरण येथील डॉ. सोमनाथ भोडान यांनी ९५४ गोवर्ग जनावरांचे लसीकरण केले आहे. असे एकूण तालुक्यात २ हजार ९५४ गोवर्ग जनावरांना त्यांच्या संरक्षणासाठी लम्पी चर्म रोगाच्या आजाराची लस देण्यात आली आहे.त्यामुळे येथील गाई,म्हैशी,बैल या पाळीव पशू मालकांनी लम्पि रोगापासून गुरांना वाचविण्याचा निश्वास सोडला आहे.

# रायगड जिल्ह्यातील स्वराज्य संघटनेच्या पहिल्या शाखेचे नवीन पनवेल येथे छत्रपती संभाजी राजे यांच्या हस्ते उद्घाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशक छत्रपती संभाजी राजे यांच्या स्वराज्य संघटनेची गाव तिथे शाखा संकल्पनेतून रायगड जिल्ह्यातील स्वराज्य संघटनेची पहिल्या शाखेचे नवीन पनवेल तुलसी हाइट समोर सेक्टर ५ या ठिकाणी छत्रपती संभाजी महाराज यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले तसेच पनवेल विभागात अनेक ठिकाणी विनोद साबळे आणि गणेश कडू यांच्या मार्गदर्शनाखाली इतर शाखेचेही उद्घाटन करण्यात आले.

यावेळी नवीन पनवेल शहर प्रमुख पदी श्री शरद मारुती घुले, नवीन पनवेल उपशहर प्रमुख पदी श्री चंद्रकांत रामदास शिंदे, सचिव संगम काशिराम पवार, प्रसिद्धी प्रमुख श्री संतोष आमले,खजिनदार संतोष जगताप,सहसचिव ऋषिकेश शिंगोटे या सर्वांची नियुक्ती करण्यात आली.

तसेच याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे नेते बाळासाहेब पाटील,शिवसेना नेते किरण तावदरे शेकाप कामगार नेते प्रकाश म्हात्रे शेकाप युवा नेते बबन विश्वकर्मा संतोषी मोरे, मच्छिंद्र पाटील, सचिन तांबे, सुरेश भोईर, विजय धुंदरेकर, राजपाल शेगोकार, कैलास रक्ताटे, बाळा झोडगे, पूजा शेटे पदमा रक्ताटे व जगदंब मित्र मंडळाचे सर्व कार्यकर्ते व सामाजिक संघटना,राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक मान्यवर उपस्थित होते



# श्री राधाकृष्ण नामदेव मंदिरात बक्षीस वितरण संपन्न

**दै.रायगड नगरी । तळे**



श्री देव राधाकृष्ण नामदेव शिंपी समाज संस्था गेली अनेक वर्ष सामाजिक धार्मिक शैक्षणिक सांस्कृतिक अशा विविध कार्यक्रमातून समाजप्रबोधनाचे कार्य करीत आहे या संस्थेचा श्रीकृष्ण जन्मोत्सव हा महत्त्वाचा उपक्रम असून या काळात ललिताच्या दिवशी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते या कार्यक्रम प्रसंगी महिलांचे सुंदर सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. त्याचा बक्षीस समारंभ संस्थेचे अध्यक्ष श्री महेंद्र कजबजे यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडला.

याप्रसंगी संस्थेची विश्वस्त रवींद्र वाईकर प्रकाश दलाल पुरुषोत्तम मुळे सतीश मुद्राळे प्रमोद मेकडे महिला अध्यक्ष सौ जानकी कजबजे उपाध्यक्ष सौ पुजा मेकडे सचिव सौ नेहा पांढरकामे उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे उपाध्यक्ष प्रकाश मेकडे सचिव नमित पांढरकामे खजिनदार श्रीराम कजबजे सदस्य किरण मेकडे विवेक कजबजे युवक मंडळ अध्यक्ष ओमकार कजबजे उपाध्यक्ष केतन लिमकर सचिव श्रेयस रोडे खजिनदार शुभम बारटक्के सदस्य प्रसाद बारटक्के सागर मुद्राळे ऋषिकेश बारटक्के निशांत मुद्राळे व महिलावर्ग फार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या सांस्कृतिक कार्यक्रमात देव श्री गणेशा दर्शन घेईना, मी नाचू नाचू, राधे कृष्ण राधा, नंदकिशोर चीत चकोरा, कुणा चालत्या रानात,ओ शेठ, चंद्रमुखी चंद्रा, पंढरी पंढरी माऊली, आज आला जिंकूनिया, पारंपारिक बोंडला, मैने पायल है छनकाई, आम्ही शिंपीयांची पोर, गलतीसे मिस्टेक, दहीहंडी उत्सव यासारखे एका पेक्षा एक नृत्याविष्कार सादर करीत लोकांची मने जिंकून वाहवा मिळवण्यात डान्सला बक्षीस प्राप्त झाली होती. त्यांचा बक्षीस वितरण कार्यक्रम उत्साहात दिनांक ८ ऑक्टोबर २०२२ रोजी पार पडला.

याप्रसंगी श्रीराम कजबजे, पुरुषोत्तम मुळे, जान्हवी कजबजे, चंद्रकांत रोडे, महेंद्र कजबजे यांनी आपले मनोगतातून तळा शिंपी समाजाकडे अगदी पूर्वांपार कलेचा वारसा आहे तीच परंपरा आजही महिला मंडळांनी व युवक मंडळाने चालू ठेवली आहे. त्याचा अभिमान वाटतो. आपल्या समाज बांधवांनी अनेक नाट्यप्रयोगातून समाजाला सांस्कृतिक कार्यक्रमाचा वारसा दिलेला आहे तेच काम आज पुढे चालू आहे येणारी तरुण पिढी हाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून सांस्कृतिक नृत्य यासारख्या कला जोपासण्याचा प्रयत्न करतील. कौटुंबिक जबाबदारी सांभाळत असताना महिला वर्गाने पुढाकार घेऊन दोन तीन तास करमणुकीचे कार्यक्रम या निमित्ताने करून समाजाला प्रेरणा देण्याचे काम केलेले आहे. आपला समाज महिला मंडळाच्या अशा स्तुत्य उपक्रमासाठी पाठीशी राहील असे सांगताना महिला मंडळ अध्यक्ष सौ जानकी कजबजे यांनी असे कार्यक्रम दरवर्षी करू असे आश्वासन दिले.

या कार्यक्रमासाठी छोटी, लहान, मध्यम वयाची, युवक, युवती, महिला, आजी, आजोबा मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आभार प्रदर्शन युवक मंडळाचे माजी अध्यक्ष तथा का. मं. सदस्य मितेश मुळे यांनी उत्तम प्रकारे केले. त्यानंतर दांडिया नृत्य देखील उत्साह पार पडले. दिवसभराच्या दैनंदिन कामकाजातून थोडासा विरंगुळा महिला मंडळांना यामधून मिळतो.




पृष्ठ क्र.१ वरुन...

## कर्मचाऱ्यांनी केला ४१,६२,५००/– रुपयांचा अपहार

४६५, ४६७, ४६८, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक आर.बी. आल्हाट हे करीत आहेत. सदर आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. मात्र या प्रकारामुळे श्रीवर्धन तालुक्यात चांगलीच खळबळ उडाली आहे.

## उरण वायु विद्युत केंद्रातील दुर्घटनेत विष्णू पाटील या ही कामगाराचा मृत्यू संतप्त

भाजले गेले. जखमींना तातडीने राष्ट्रीय बर्न सेंटर, ऐरोली येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले. जखमींपैकी विवेक धुमाळे यांचा रुग्णालयात नेत असतानाच मृत्यू झाला. उर्वरित दोघांवर सध्यस्थितीत वरिष्ठ डॉक्टरांमार्फत आय.सी.यु मध्ये तातडीने उपचार सुरू असताना कंत्राटी कामगार विष्णू यशवंत पाटील यांचा सोमवारी ( दि१०) सकाळी उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तसेच कुंदन कमळावर पाटील या जखमी कामगारांवर उपचार सुरू असून त्यांचीही प्रकुती चिंताजनक आहे.तर डेस्क ऑपरेटर – प्रदीप सिंग, यांना किरकोळ दुखापत झाली असल्याने त्यांना मात्र बेलापूरच्या अपोलो हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन महानिर्मितीचे संचालक संजय मारुडकर व कार्य संचालक गिरीश कुमारवार यांनी इस्पितळात भेट दिली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली उरण वीज केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे पुढील कार्यवाही करत आहेत. सदर प्रकल्पात चार गॅस टरबाईज असून ८०५ मेगावाट वीज निर्मिती केली जाते. सदर प्रकल्पातील प्लांट हा आटो मेटीक आहे. सध्या या प्रकल्पात बॉयलर आपरेटर नाही. सेफ्टी अधिकारी तीन वर्षे नाही आणि जो सेफ्टी अधिकारी आहे. तो अनुभवी नाही तो शिकावू आहे. रविवारच्या दुर्घटनेमुळे ४५ मेंगावाट विज चा तुटवडा निर्माण झाला आहे. सदर दुर्घटनेत फक्त २५ लाखाच नुकसान झाले आहे. उत्तम दर्जाचे शिक्षण घेतलेला सेफ्टी अधिकारी हा एक वर्षानंतर प्रकल्पात येणार आहे.दुर्घटनेत मयत कामगारांच्या वारसांना नोकरी देण्यासाठी वरिष्ठ स्तरावरून प्रयत्न सुरू आहेत. अशी माहिती प्रकल्पाचे सुप्रिटेंडर इंजिनिअर एस.एल.वाघ यांनी पत्रकारांना दिली आहे

या घटनेचे गांभीर्य ओळखून कामगार नेते भुषण पाटील,रायगड जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर,लक्ष्मण पाटील,संध्या ठाकूर,दर्शन घरत,सरपंच मानसी पाटील,शेखर पाटील, सुनील पाटील, महादेव घरत सह भेंडखळ, बोकडवीरा,फुंडे, डोंगरी ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थांनी विष्णू यशवंत पाटील या सह इतर मयत कामगारांच्या वारसांना कायमस्वरूपी नोकरी आणि ५० लाख रुपये भरपाई द्यावी.अशी मागणी प्रकल्पाच्या प्रवेशद्वाराजवळ केली आहे.तसेच विष्णू यशवंत पाटील यांचा मुत्यू देह रुग्णवाहिकेव्दारे प्रकल्पाच्या गेट समोर आणण्याचा निर्णय घेतला आहे.

## रविवारी खांदा कॉलनीत मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषधे वाटप महाशिबीर

कळंबोली, डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल नेरुळ, भारती विद्यापीठ खारघर, तेरणा मेडिकल कॉलेज नेरुळ, येरळा मेडिकल ट्रस्ट, साईट फर्स्ट केअर, नायर हॉस्पिटल, व्हिट सेंटर, शंकरा आय हॉस्पिटल, अपोलो हॉस्पिटल, टाटा कॅन्सर हॉस्पिटल परळ, सत्य साई संजिवनी हॉस्पिटल खारघर या नामांकित वैद्यकीय संस्थांचा सहभाग असणार आहे. तरी या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव परेश ठाकूर यांनी केले आहे.

मे.पांडे साहेब यांच्या कोर्टात
अॅड.रसिका नरेश भगत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्रं.१०८६/२०२२
ने.ता.१४/११/२०२२

श्री.ज्ञानेश्वर चिंतामण म्हात्रे
वय : ६६ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.मु.पो.कातकरवाडीजवळ, कुंडेवहाळ,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र–४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी /
निबंधक जन्म मृत्यू नोंदणी विभाग
ग्रुप ग्रामपंचायत कुंडेवहाळ, ता.पनवेल,
जि.रायगड, पिन कोड ४१०२०६ सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवासी असून अर्जदार यांनी त्यांचे आजोबा कै.अंबाजी चाहु वासकर हे अर्जदार यांचे आजोबा असून कै.अंबाजी चाहु वासकर हे मौजे कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथील कायमचे रहिवासी होते व कै. अंबाजी चाहू वासकर यांचा मृत्यू दि.१०/०१/१९२६ रोजी मौजे : बेलपाडा, पोस्ट : जासई, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे. व त्याबाबत अर्जदार यांनी मृत्यूचा दाखला मिळणेकरिता या न्यायालयात अर्ज केला आहे.

अर्जदारांचे मागणीप्रमाणे कै.अंबाजी चाहु वासकर यांच्या मृत्यूचा दाखला अर्जददार यांना देणेबाबत कोणाचीही कोणतीही हरकत असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दि.१४/११/२०२२ रोजी पर्यंतचे आत लेखी / तोंडी हरकत दाखल करावी.

वरील मुदतीस कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या आजोबांचा मृत्यूदाखला देणेबाबत योग्य ते आदेश करण्यात येतील याची दखल घ्यावी.

आज दि.१०/१०/२०२२ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/– क.लिपीक फौ.न्याया.,पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया.,पनवेल |
|---|---|---|

मा.पांडे साहेब कोर्ट
अॅड.सचिन बा. कांबळे
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्रं.११२३/२०२२
ने.ता.१४/११/२०२२

श्री.मोहन विनायक घरत
वय : ५५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.मु.मुर्बी गाव, पो.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
आरोग्य विभाग, खारघर
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, श्री.मोहन विनायक घरत ह्यांचा जन्म दि.०२/०२/१९६७ रोजी मु.मुर्बी गाव, पो.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यावेळी राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव आई वडिलांकडून अनावधानाने श्री.मोहन विनायक घरत यांची जन्माची नोंद करायची राहून गेली आहे. परंतु काही कारणास्तव जन्माची नोंद करून घेणे व जन्माची नोंद कुठे करतात व कशासाठी करून घेतात याची त्यांच्या आई वडिलांना काही पूर्व कल्पना नव्हती.

तरी अर्जदार यांच्या जन्माची नोंद बदलून कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या मागणीद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणिते सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३/३ प्रमाणे जन्माची नोंदणी परवानीचा अर्जदारांचा अर्जातील मागणी विनंती सिद्ध झाल्यास त्यांना हे जन्माची नोंद मंजूर करेल.

आज दि.१०/१०/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/– क.लिपीक फौ.न्याया.,पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया.,पनवेल |
|---|---|---|

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## संक्षिप्त...

# तळा कॉलेजमध्ये विद्या प्रबोधिनी उपक्रम सुरू

**दै.रायगड नगरी । तळे**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व विद्याशाखाच्या वतीने शनिवार दिनांक ८ ऑक्टोबर २०२२ रोजी विद्या प्रबोधिनी या उपक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त मारोती शिर्के, उपाध्यक्ष पुरूषोत्तम मुळे, सचिव मंगेश देशमुख, कार्यकारी मंडळाचे सदस्य बी के पटेल, महादेव बैकर, राजू सप्रे, वरीष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ भगवान लोखंडे, मुख्याध्यापक धुमाळ सर, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ भगवान लोखंडे यांनी विद्या प्रबोधिनी या उपक्रमामागील उद्देश सांगितला. विद्या प्रबोधिनी हा उपक्रम काही वर्षांपासून द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये कार्यान्वित आहे. या माध्यमातून शिक्षक, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी आप आपल्या क्षेत्रातील अद्ययावत माहिती व ज्ञान याबाबत अद्ययावत रहाण्याच्या दृष्टीने संवादी व्हावे, त्यांचा आंतर विद्याशाखीय दृष्टीकोन वाढीस लागावा, विषय मांडणीचे कौशल्य अधिक वृद्धिंगत व्हावे हा या विद्या प्रबोधिनी मागील प्रधान हेतू असल्याचे प्रतिपादन केले.

यावेळी प्राध्यापक डॉ. दिवाकर कदम यांनी वैश्विक मानवी मूल्य या विषयाची मांडणी केली. तर संस्थेचे विश्वस्त मारोती शिर्के, अध्यक्ष चंद्रकांत रोडे,उपाध्यक्ष पुरूषोत्तम मुळे, सचिव मंगेश देशमुख, सदस्य राजू सप्रे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले व प्राचार्य डॉ लोखंडे यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष श्री पुरुषोत्तम मुळे यांनी आपल्या शालेय जीवनातील अशा प्रकारच्या उपक्रमाचा संदर्भ देऊन त्याचे बौद्धिक विकासातील महत्त्व अधोरेखित केले. संस्था सचिव मंगेश देशमुख यांनी तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व विद्याशाखांच्या माध्यमातून एकत्रित कार्यक्रम घडवून आणण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरेल. या उपक्रमात सातत्य रहावे अशी अपेक्षा ही व्यक्त केली. संस्थेचे विश्वस्त मारुती शिर्के गुरुजी यांनी या उपक्रमातून संस्था उंची वर पोहचेल अशी अपेक्षा व्यक्त केली. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे यांनी आपल्या व्यक्तिगत जीवनातील अनूभव व्यक्त करत आपल्या खास शैलीत सदिच्छा दिल्या. या उपक्रमात दर महीन्याच्या दुसऱ्या शनिवारी दुपारी १२:३० वाजता आपल्याच कर्मचारी वर्गापैकी एक जण त्यांचे अभ्यासाचे विशेष क्षेत्र असलेल्या एखाद्या घटकांवर व्याख्यान देतील उपस्थित शिक्षक त्यावर चर्चा करतील व एखाद्या अनोळखी विषयाशी संवादी होतील असे नियोजन करण्यात आले.

# माथेरान पतसंस्थेत सभापती पदावर कुणाची वर्णी लागणार?

## अजय सावंत, रामचंद्र ढेबे की विजय कदम : मतदारांमध्ये औत्सुक्यता







**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेच्या सन २०२२/२३ ते सन २०२७/२८ या कालावधीसाठी दि. ७ ऑक्टोबर रोजी निवडणूक प्रक्रिया पार पडली. यामध्ये शिवराष्ट्र पॅनेल आणि पिसारनाथ पॅनेल मध्ये लढत झाली होती.त्यामध्ये पतसंस्थेतील मतदारांनी शिवराष्ट्र पॅनेलच्या बाजूने आपले निर्विवाद बहुमत दिलेले आहे. त्यामुळेच एकूण सर्वच तेरा जागांवर आपले उमेदवार शिवराष्ट्र पॅनेलने निवडून आणलेले आहेत. यामध्ये ही लढाई खऱ्या अर्थाने ई रिक्षाच्या भोवतीने घेरली गेली होती.

ई रिक्षाला समर्थन करणारे काँग्रेस पक्ष, भारतीय जनता पक्ष त्याचप्रमाणे शिंदे गटाचा जाहीर पाठिंबा हा विकासात्मक ई रिक्षाच्या बाजूने होता. त्यामुळेच ई रिक्षाच्या विरोधात ज्या खऱ्या अर्थाने अधिक संख्यात्मक घोडेवाल्यांनी आपली मते टाकली तीच मते यावेळेस निर्णायक ठरली आहेत.त्यामुळे पतसंस्थेच्या निवडणुकीत शिवराष्ट्र पॅनेलला विजय संपादन करता आला आहे.आगामी काळात सुध्दा त्याच अधिक संख्यात्मक घोडेवाल्यांना सोबत घेऊन या पॅनेलला नगरपरिषदेच्या निवडणुकीला सामोरे जावे लागणार आहे असेही बोलले जात आहे. गावातील किती घोडेवाले मतदार कुणाच्या बाजूने ठामपणे उभे असतात हे त्यांनी आपल्या मागण्यांसाठी ज्या ज्या वेळी मोर्चाचे आयोजन केले होते त्यावेळी स्पष्टपणे दिसून आलेले आहे.

एकंदरीत मतदारांनी शिवराष्ट्र पॅनेलला बहुमत देऊन त्यांच्या उमेदवारांना पतसंस्थेत पाठविले आहे त्यामुळे या पतसंस्थेत सभापती पदावर कुणाची वर्णी लागणार असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. अनेक वर्षे या पतसंस्थेचे सभापती पद हे अनुभवी, अभ्यासू व्यक्तिमत्त्व असलेले माजी नगराध्यक्ष अजय सावंत यांनी भूषविले आहे.तर जवळपास पंधरा वर्षे विजय कदम यांनी पतसंस्थेत संचालक म्हणून कार्यभार पाहिला आहे. आणि ज्या अधिक संख्यात्मक घोडेवाल्यांमुळे या पॅनेलला विजय प्राप्त झाला आहे त्या बाजूने रामचंद्र ढेबे हे सुध्दा या सभापती पदावर विराजमान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांचा सुध्दा काही काळ पतसंस्थेत संचालक मंडळात सहभाग राहिलेला आहे.अशी चर्चा सध्या गावात जोर धरू लागली आहे.तर या पॅनेलला पाठिंबा देणारे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते, आरपीआय गटाचे नेते यांनी सुध्दा या निवडणुकी कामी मोलाचे योगदान दिले आहे त्यामुळे तज्ञ संचालक म्हणून कदाचित या दोन्ही पक्षाच्या नेत्यांना ही संधी यावेळेस मिळण्याची शक्यता सुध्दा नाकारता येत नाही.पुढील काही दिवसात ही पदे कुणाला मिळणार हे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# पनवेल शहरातील रेलिंग होत आहे गायब



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरात पदपथा लगत रेलिंग बसवण्यात आले आहेत. परंतु अनेक ठिकाणी रेलिंग गायब झाल्याचे पाहायला मिळत आहे. परिणामी पदापथांवर वाहनांचे अतिक्रमण वाढले आहे. तर काही ठिकाणी व्यावसायिकांच्या हेतूसाठी रेलिंग बसवलेच नसल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

पनवेलमध्ये अनेक ठिकाणी फुटपाथलगत लोखंडी रेलिंग बसवण्यात आले. मात्र हे रेलिंग काही दिवसांपुरताच व्यवस्थित राहिले. बहुतांशी ठिकाणचे हे रेलिंग तुटलेल्या अवस्थेत आहे तर काही ठिकाणी रेलिंग काढण्यात आल्याचे प्रकार बघायला मिळत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ एका इमारतीचे काम सुरू आहे. या ठिकाणचे संपूर्ण रेलिंग गायब झाले आहे. मात्र या प्रकारावर पालिका काहीही बोलायला तयार नाही. तर काही ठिकाणी व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी रेलिंग काढण्यात आले आहेत. कित्येक ठिकाणी रेलिंग तोडण्यात आलेले आहेत.

# पेण तालुक्यात डायरेक्ट व्हॉलीबॉल प्रमोशन असोसिएशनची स्थापना

**दै.रायगड नगरी । पेण**

संपूर्ण देशभरात नावारूपाला आलेल्या डायरेक्ट व्हॉलीबॉल प्रमोशन असोसिएशनची पेण तालुक्यात देखील स्थापना करण्यात आली. या कार्यकारिणीत सामाजिक कार्यकर्ते समीर म्हात्रे यांची पेण तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी व्हॉलीबॉल हा खेळ तालुक्यातील प्रत्येक गावागावात पोहोचविण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन अशी ग्वाही समीर म्हात्रे यांनी दिली. तर महाराष्ट्र राज्य डायरेक्ट व्हॉलीबॉल प्रमोशन असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी शरद कदम यांनी व्हॉलीबॉल हा खेळ पारंपरिक खेळ असल्याने या खेळाला आपण संघटीत होऊन अंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचऊ या असे आवाहन केले.

कबड्डी हा खेळ देखील पारंपरिक खेळ असून या खेळाने राज्यासह देशभरात चांगल्या प्रकारे उभारी घेतली आहे. त्याप्रमाणेच व्हॉलीबॉल हा पारंपरिक खेळ देखील देशासह आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवा यासाठी महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा विद्यमान विरोधी पक्ष नेते अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करत असणारी डायरेक्ट व्हॉलीबॉल असोसिएशन ही संघटना प्रयत्न करत आहे. या असोसिएशनला जवळपास २६ देश संलग्न असुन राज्यातील देखील २६ जिल्हे सहभागी झाले आहेत. रायगड जिल्ह्याचा विचार करता जिल्हयातील कर्जत, खालापूर, उरण, पनवेल, अलिबाग, पाली – सुधागड आदी ठिकाणी या असोसिएशनची स्थापना करण्यात आली असून आज पेण येथे देखील स्थापना करण्यात आली.

यावेळी पेण तालुका डायरेक्ट व्हॉलीबॉल प्रमोशन असोसिएशनच्या अध्यक्षपदी समीर म्हात्रे, कार्याध्यक्ष पदी रायगड जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, उपाध्यक्ष रमेश म्हात्रे, नरेन्द्र पाटील, जनरल सेक्रेटरी हिरामण भोईर, सहसेक्रेटरी रुपेश कदम, खजिनदार नितिन वर्तक, सहखजिनदार सुभाष पाटील, तसेच सदस्य पदी निखिल पाटील, विलास पाटील तर पंच कमिटी अध्यक्ष पदी गजानन पाटील व पंच कमिटी सेक्रेटरी पदी नरेंद्र पाटील यांची एकमुखी निवड करण्यात आली. तर प्रसिध्दी प्रमुख पदी पत्रकार स्वप्नील पाटील व संतोष पाटील यांची निवड करण्यात आली. पेण तालुका डायरेक्ट व्हॉलीबॉल प्रमोशन असोसिएशनचे नवनिर्वाचित अध्यक्ष समीर म्हात्रे यांनी बोलताना सांगितले की, ज्याप्रमाणे मी कबड्डी खेळाची धुरा यशस्वीरीत्या सांभाळली, त्याप्रमाणेच व्हॉलीबॉलची धुरा देखील चांगल्या प्रकारे सांभाळून प्रत्येक गावागावात हा खेळ पोहचवून राष्ट्रीय आणि अंतरराष्ट्रीय स्तरावर पेण तालुक्यातील खेळाडू पोहोचविण्यासाठी मी प्रयत्नशील असणार असल्याचे सांगितले. तर महाराष्ट्र राज्य डायरेक्ट व्हॉलीबॉल प्रमोशन असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी शरद कदम यांनी आपल्या तालुक्याचा पाया मजबूत करा पाया मजबूत केला तर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर यशाचे कळस नक्कीच चाढवता येईल असे सांगुन कामाला लागण्याचे आवाहन केले.



# कार्यतत्पर मा. नगरसेवक राजू सोनी यांनी करून दिली छत्रपती शिवाजी महाराज चौकाची स्वच्छता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे कार्यतत्पर मा. नगरसेवक राजू सोनी यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकाची स्वच्छता करून दिली आहे. यामुळेशिवप्रेमींनी त्यांचे आभार मानले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात अस्वच्छता व कचरा साठला होता याबाबत शिवप्रेमींनी त्यांच्यासमोर कैफियत मांडताच तत्परतेने त्यांनी स्वतःकडील कामगार लावून तो चौक व परिसर संपूर्ण साफसफाई करून स्वच्छ करून दिल्याने शिवप्रेमींनी त्यांचे आभार मानले आहे.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविणे आमचे अशिल जनार्दन शिवराम घाडगे पत्ता फ्लॅट न ३०२, गोकुळ अपार्टमेंट गोवर्धन हवेली जवळ प्लॉट न ३८, सेक्टर –२९, वाशी नवी मुंबई, हे खालील वर्णांनाचा भूखड पांडुरंग आंबु कातकरी यांचे कडून त्रिपक्षीय करारनामाद्वारे हस्तांतरण करून घेत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**भूखंड क्र.३२२, सेक्टर –२५, पुष्पकनोड – वहाळ,तालुका पनवेल, जिल्हा रायगड, क्षेत्रफळ – ९० चौ.मी.**

तरी याबाबत कोणा व्यक्ती, संस्था, सरकारी निमसरकारी, संस्था याचे दान, गहाण, बोजा, बक्षीस, फरोक्त, कोर्ट दावा, वा इतर काही हरकत असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर संपर्क साधावा,मुदती नंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.१०/१०/२०२२
नवी मुंबई

**सही/–**
**ॲड.रेखा होवाळे**
**ऑफीस न.१३, प्रभात सेटर, सीबीडी बेलापूर**

## PUBLIC NOTICE

THIS NOTICE is hereby given on behalf of my client M/S. PRATHAMESH INFRA REALITY PVT.LTD through Director Mr. AJIT SHRINATH SINGH, who have filed Special Civil Suit No. 273/2013, in Panvel Court against Original Owners/Farmers in respect of property mentioned herein below in the schedule for Specific Performance of Contract and Injunctionagainst Agreement dated 30/03/1998 and 07/10/2010. Also my client have purchased complete rights, title, benefits, interests in the said below mentioned property from said Original Owners/ Farmers, 1). Shri Dharma Naga Koli, 2). Shri. Hemant Dharma Koli, 3). Shri. Nahush Dharma Koli, 4). Shri Kalpesh Dharma Koli,

Hence on behalf of my client, I am giving this Notice to Public at large that not to deal with the above mentioned persons in respect of the aforesaid property. And inspite of this person deal with them or their agents regarding below mentioned properties and faces any loss, then my client will not be responsible for that, they may do so at their own risks, costs and consequences which please note.

**SCHEDULE : DETAILS OF CIVIL SUIT**
IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D) PANVEL
Special Civil Suit No. 273/2013
Name of Defendant :- Dharma Naga Koli and others
Discription of Property.
Admeasuring about 3898.94. Sq.Mtrs
Cidco File No. 918, Plot No. 188, Sec-20-Ulwe 1-B, Ulwe, Navi Mumbai.

Sd/-
**Advocate Deepak Khot**
BSL,LLB, HighCourt, Mumbai.
Add: Off No 32, Plot No 21, Sec-11
CBD BELAPUR, NAVI MUMBAI
Mob No : 9270355370

अर्जदारतर्फे वकील : अनंत देवजी पाटील

## जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्याया.सो.रायगड यांचे कोर्टात
मो.अप.क्लेम नं.४६३/२००९
एम.ए.नं.१/२०१५
नि.नं.१७/ड
ने.ता.२८/११/२०२२

प्रशांत मोरेश्वर पोंक्षे वगैरे १ — अर्जदार
विरुद्ध
१) विश्वनाथ मारुती फडतरे
२) रिलायन्स जनरल इश्युरन्स कं.लि. — सामनेवाला
प्रति,
सामनेवाला नं.१) विश्वनाथ मारुती फडतरे
वय : २४ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.एफ ९७/७, सेक्टर १३,
सिडको कॉलनी, ता.पनवेल,
जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०६

दि.२०/०८/२००९ रोजी सकाळी ६.५० वाजण्याच्या सुमारास मौजे : पनवेल हद्दीत, अमरधाम स्मशानभूमी समोर, मुंबई पुणा हायवे रोडला लागून असलेल्या पनवेल रोडवर, पनवेल शहर पोलीस स्टेशन नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या हद्दीत झालेल्या अपघातामध्ये अनिकेत उर्फ परमेश्वर प्रशांत पोंक्षे हा सीकेटी हायस्कूल पनवेल (इंग्लिश मिडीयम) येथे जाण्यासाठी मिनीबस नं.एमएच ०४/जी/२५३४ मधून जात सदर मिनीबसला आग लागून अपघात घडवून आणला. सदर अपघातामध्ये मिनीबस नं.एमएच ०४/जी/२५३४ वरील चालक अनिकेत उर्फ परमेश्वर प्रशांत पोंक्षे यांच्या मरणास कारणीभूत ठरले आहेत.

म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेकरिता अंदाजे रु.४,००,०००/– ची नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हास जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दि.२८/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयात सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०७/१०/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक जिल्हा न्यायालय रायगड–अलिबाग** (कोर्टाचा शिक्का) **सही/– सहा.अधिक्षक जिल्हा न्यायालय रायगड–अलिबाग**

मा.गोडसे मॅडम कोर्ट
ॲड.शशिकांत काळू म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.१४२२/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०८/१२/२०२२

१) श्री.पंढरीनाथ नामदेव पाटील
वय : ७५ वर्षे, धंदा : व्यवसाय
२) श्री.वसंत नामदेव पाटील
वय : ७३ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.मु.पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.रमाबाई अनंता भोईर
वय : ७१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नितळस, पो.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्रीमती.विमल यशवंत पाटील
वय : ६९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.राजेश निवास, नवापाडा,
डोंबिवली, पश्चिम, जि.ठाणे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार क्रं.१ ते ५ यांची आई कै.गोदावरी नामदेव पाटील ह्या दि.१४/०३/२०२० रोजी मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. तसेच त्यांची आई कै. देवकीबाई बाळू भंडारी ह्या जुलै १९७३ रोजी ब्राह्मण, करवले, ता.कल्याण, जि.ठाणे येथे मयत झाल्या आहेत. कै.गोदावरी नामदेव पाटील यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| नावडे, ता.पनवेल, जि.रायगड | १५९ | १६८ | २ | ०–२३–० |
| | | १९५ | ३ | ०–१२–० |
| | | १६७ | १ | ०–२१–० |
| | | २०७ | ४ | ०–२१–८ |

कै.गोदावरी नामदेव पाटील यांचे वर नमूद मिळकतीस अर्जदार हेच वारसदार आहेत असा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या. वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतीस कै.गोदावरी नामदेव पाटील यांचे अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.१०/१०/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक फौ.न्याया.,पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया.,पनवेल**

श्रीमती.एस.एस.मुजावर साहेब
अर्जदाराचे वकील : ॲड.सुवर्णा तांडेल

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्रं.१९५/२०२२
नि.नं.१०/ड
ने.ता.१२/१०/२०२२

बाळुबाई तुकाराम कोळी उर्फ
सौ.बाळुबाई महादेव कोळी
वय : ५२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.९७५ बी, कोळीवाडा, बेलपाडा,
पो.जासई, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, वरील अर्जदार यांचे वडील कै.तुकाराम कमळ उर्फ कमळ्या कोळी हे दि.०१/१०/२०१७ रोजी मौजे : बेलपाडा, पो.जासई, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्याचप्रमाणे अर्जदार यांची आई कै.यमुना तुकाराम कोळी ह्या दि.२०/१२/२००६ रोजी मौजे : बेलपाडा, पो.जासई, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. कै.तुकाराम कमळ उर्फ कमळ्या कोळी ह्यात असताना त्यांच्या मृत्यूसमयी त्यांच्या नावे असणाऱ्या खालील वर्णनाच्या जमीन मिळकती ह्या सरकारतर्फे सिडकोने ''नवी मुंबई'' योजनेसाठी भूसंपादीत केल्या आहेत. त्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**भूसंपादीत जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : जसखार, ता.उरण, जि.रायगड**

| युनिट केस क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र एकर आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| १९१ | २२५ | ८ | ००–२२–५० पो.ख.००–०२–०० | ०.०० |
| १९१ | २५६ | ८ | ००–०६–५० पो.ख.००–००–८० | ०.०० |
| १९१ | २६५ | १ | ००–११–६० पो.ख.००–०१–९० | ०.०० |
| १९१ | २६६ | ७ | ००–११–२० पो.ख.००–००–०० | ०.०० |
| | | | ०१–२१–०० | |

येणेप्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.तुकाराम कमळ उर्फ कमळ्या कोळी यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२० माहे ९ सन २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## पात्र फेरीवाल्यांची यादीप्रसिद्ध; हरकती व सूचना मांडण्यासाठी २५ ऑक्टोबर अंतिम मुदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पालिका अंतर्गत फेरीवाल्यांना सहाय्य या घटकाचे काम पहिले जाते. या घटकांतर्गत करण्यात सर्वेक्षणात आलेल्या फेरीवाला पात्र ठरलेल्या फेरीवाल्यांची यादी पालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून यावर हरकती व सूचना मांडण्यासाठी पालिकेकडून २५ ऑक्टोबरपर्यंत वेळ देण्यात आली आहे.

पनवेल पालिका क्षेत्रातील विविध भागात मोठ्या प्रमाणात फेरीवाले व्यवसाय करीत आहेत. फेरीवाल्यांचे पुनर्वसन करण्याची जवाबदारी पालिका प्रशासनावर येऊन पडली आहे. फेरीवाल्यांची ही समस्या सोडवण्यासाठी व सिडकोने फेरीवाल्यांकरिता राखीव ठेवलेल्या भूखंडावर त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी पालिकेच्या वतीने फेरीवाला समिती स्थापन करण्यात आली असून, पालिका हद्दीतीलफेरीवाल्यांच्या सर्वेक्षणाला सुरुवात करण्यात आली आहे.

या सर्वेक्षणान आखून दिलेल्या निकषावर पात्र ठरलेल्या फेरीवाल्यांची यादी पालिकेच्या संकेतस्थळावर २३ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध झाली आहे. पालिकेने या यादीवर हरकती आणि सूचना मांडण्यासाठी २५ ऑक्टोबर पर्यंत कालावधी देण्यात आल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली आहे.

जवळपास ५५ भूखंडांचे हस्तांतरण पालिकेकडे झाले आहे तर काही भूखंडांचे हस्तांतरण पालिकेकडे होणे बाकी आहे. पालिकेकडे हस्तांतरित झालेल्या भूखंडावर फेरीवाला धोरणा नुसार पात्र फेरीवल्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे.

## अज्ञात मोटार सायकलस्वाराने केली पत्रकाराला मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघरमध्ये एका अज्ञात मोटरसायकलस्वाराने वाहन बाजू देण्याच्या कारणांवरून पत्रकाराला मारहाण केल्याची घटना घडली आहे. याबाबतची तक्रार खारघर पोलीस स्थानकात दाखल करण्यात आली आहे.

खारघरमधील नवलोकहित दृष्टी या साप्ताहिकाचे संपादक संदेश सोनमळे यांना एका अज्ञात मोटर सायकल स्वाराने सेंट्रल पार्कच्या रस्त्यावरती वाहनाला बाजू देण्याच्या कारणांवरून मारहाण केली. याबाबतची तक्रार संदेश सोनमळे यांनी खारघर पोलीस स्थानकात दाखल केली असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### दैनिक रायगड नगरी इफेक्ट ....

## आगरदांडा -दिघी मार्गावर होणारी प्रवाशांची लुट अखेर थांबली

**दै.रायगड नगरी । मुरुड**

आगरदांडा –दिघी या एकाच जलमार्गावर मार्गावर चालणाऱ्या दोन फेरी बोटींच्या तिकीट दरात असणाऱ्या प्रचंड तफावतीमुळे प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. सुवर्ण दुर्ग शिपींग कारपोरेशन ची फेरी बोट ५० रु जादा आकारुन प्रवाशांची लुट करत होती. गेले दिड वर्ष चाललेल्या या लुटीकडे मेरीटाईम बोर्ड दुर्लक्ष करत होती. अखेर दि. ०६ एप्रिल रोजी दैनिक रायगड नगरी मध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या प्रभावामुळे रविवार दि.०९ ऑक्टोबर पासुन दोन्ही फेरी बोटीचे दर समान झाल्याने संभ्रम दुर होऊन प्रवाशांची होणारी लूट अखेर थांबली आहे. त्यामुळे प्रवाशांमधुन समाधान व्यक्त होत आहे.

सन २०२२ डिसेंबर पासून फक्त तिन महिन्यांसाठी टिकीट दरवाड सुवर्ण दुर्ग शिपींग कारपोरेशनला मेरीटाईम बोर्डाने दिली होती. दिघी सागरी जलवाहतूक सोसायटीला तिकीट दर वाढ करण्याची परवानगी मात्र मिळाली नाही. त्यामुळे या एकाच जलमार्गावर चालणाऱ्या या दोन फेरी बोटींच्या तिकीट दरात प्रचंड तफावतीमुळे प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. वाढीव दर घेणाऱ्या सुवर्ण दुर्ग शिपींग कारपोरेशनला फक्त तिन महिन्यांसाठी तिकीट दर वाढ करण्याची परवानगी होती ती संपली तरी गेले दिड वर्ष तिकीट दर कमी न करता बिंधास्त प्रवाशांची लुट सुरू होती.

अखेरीस प्रवाशांनी आमच्या प्रतिनिधींच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. या लुटी संदर्भातील वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर मेरीटाईम बोर्डाने दखल घेतली व वाढिव दर कमी केले दोन्ही फेरी बोटीचे दर समान झाल्याने प्रवाशांमधील संभ्रम दूर होऊन होणारी पर्यटकांची लूट अखेर थांबली आहे. याबद्दल प्रवाशांनी आमच्या प्रतिनिधीचे व सदरच्या वृत्त पत्राचे आभार मानले आहेत.




दिघी-आगरदांडा जलवाहतूक प्रवास बनला संभ्रमाचा
दोन फेरी बोटमधील प्रवास दरात ५० रुपयांची तफावत

## हायकल लिमिटेडमधील कामगारांना १६ हजार २०० रुपयांची भरघोस पगारवाढ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जय भारतीय जनरल कामगर संघटनेच्या माध्यमातून तळोजा औद्योगिक क्षेत्रातील हायकल लिमिटेड कंपनीतील कामगारांना १६ हजार २०० रुपयांची भरघोस पगारवाढ तसेच विविध सुविधा देणारा करार भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष तथा संघटनेचे सल्लागार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत खांदा कॉलनीतील कामगार उपायुक्त प्रदीप पवार यांच्या दालनात झाला.



जय भारतीय जनरल कामगार संघटना आणि हायकल लिमिटेड कंपनीमध्ये झालेल्या करारानुसार कामगारांना चार वर्षांसाठी प्रति महिना १६ हजार २०० रुपये, निवृत्तीनंतर दोन वर्षांसाठी मेडीकल पॉलिसी, दोन लाख रुपयांपर्यंत बीनव्याजी कर्ज, सहलीसाठी ७ हजार ५०० रुपये, ०२ लाख ५० हजार रुपयांची मेडिकल पॉलिसी तसेच जास्त खर्चासाठी आणखी एक पॉलिसी, यंदाच्या वर्षासाठी ३७ हजार रुपये दिवाळी बोनस, फेस्टीवल ॲडव्हान्स म्हणून २० हजार रुपये मिळणार आहे. त्याचबरोबर दिवाळीपूर्वी या कामगारांना थकीत वेतनाचा फरक म्हणून साधारणतः ४ ते ६ लाख रुपये मिळणार असून जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. हा करार खांदा कॉलनीमधील सहाय्यक कामगार आयुक्तालयात हायकल कंपनी पदाधिकारी आणि जय भारतीय जनरल कामगार संघटनेमध्ये झाला. या वेळी जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, कामगार उपायुक्त प्रदीप पवार, सहाय्यक कामगार आयुक्त समीर चव्हाण, कंपनीचे एचआर हेड संचित सिन्हा, विशाल पाटील, डेप्युटी मॅनेजर देवेंद्र पालेकर, जय भारतीय संघटनेच्या सचिव समीरा चव्हाण, युनिट सेक्रेटरी नारायण पाटील अध्यक्ष प्रशांत कदम, राजेश साळवी, सतीश घरत, नथुराम म्हात्रे, हरिश भोईर, योगेश भोगले, संतोष शिर्के, जीन कार्डोझा आदी उपस्थित होते.

## तलावातील गाळ काढण्यास परवानगी मिळण्याकरिता पालिकेच्या वतीने याचिका दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल कळंबोली वसाहतीमधील गाळाने भरलेल्या धारण तलावांमुळे वसाहतींना पुराच्या पाण्याचा धोका वाढला आहे. यामुळे गाळ काढण्यास परवानगी मिळावी या करीत पनवेल पालिकेच्या वतीने न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. धारण तलावात ८० टक्के गाळ असल्याने केवळ २० टक्केच पाणी साचू शकते. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होत नाही.

समुद्र सपाटीपासून खाली असलेल्या कळंबोली वसाहतीत सिडकोतर्फे होल्डिंग पॉन्डची निर्मिती करण्यात आली आहे. पुराच्या पाण्यापासून वसाहतींचे संरक्षण व्हावे या हेतूने सिडकोने बांधलेले हे धारण तलाव सध्या गाळाने व खारफुटीने भरलेले आहेत. गाळ आणि खारफुटीने भरल्यामुळे या ठिकाणी नेहमीच उग्र वास येत असतो. ८० टक्के गाळ साचल्याने दरवर्षी पावसाळयात कळंबोली शहरात पाणी साचण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे या धारण तलावांची स्वच्छता व्हावी अशी मागणी करण्यात येत आहे. मात्र धारण तलावात वाढलेल्या कांदळवाणामुळे गाळ काढतांना कांदळवनांना धोका पोहचण्याची शक्यता असल्याने धारण तलावाची. स्वच्छता करण्यासाठी कांदळवन कक्षाच्या मान्यतेची गरज लागत आहे.

## रस्त्यावर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांनी नागरिक त्रस्त ; अखेर समाजसेवकांनी बुजविले खड्डे

**दै.रायगड नगरी । रोहा**

सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत असलेल्या रोहा शहरातील रस्त्यांची पार दुर्दशा झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग खात्याचे अधिकारी मात्र शहरातील खड्ड्यांच्या समस्यांकडे जाणून बुजून कानाडोळा करीत आहेत. या खड्ड्यांमुळे रोजच लहान – मोठे अपघातात घडत असून प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. खड्ड्यातून मार्ग काढताना प्रवाशांना त्रास होऊ नये म्हणुन वाहतूक पोलीस आणि समाज सेवकांनी स्वतः हून खड्डे बुजविले. त्यामुळे झोपेचे सोंग घेणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग येणार कधी? असं प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.



रोहा चणेरा रोड, फिरोज टॉकीज ते दमखाडी नका त्याचप्रमाणे जुना मच्छी मार्केट पासून ते अष्टमी नाका व पुढील नागोठणे रोड हा भाग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत येत असून रोहा नागोठणे रोडवर असलेल्या अष्टमी नाका, जुना कुंडलिका पूल, हॉटेल रोहा प्राईड समोर, त्याचप्रमाणे दमखाडी ते फिरोज टॉकीज पर्यंत असलेल्या मुख्य रस्त्यावर असंख्य खड्डे पडले असून पावसाळ्यात या खड्ड्यातून मार्ग काढताना अनेक दुचाकीस्वार खाली पडून जखमी झाले आहेत. या जीवघेण्या खड्ड्यातून रोहेकर नागरिक आजही प्रवास करीत आहेत. स्थानिक नागरिकांनी या बाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अनेकदा तक्रारी केल्या आहेत पण झोपेचे सोंग घेणाऱ्या या प्रशासनाला अद्याप जाग येत नाही.

अष्टमी नाका व हॉटेल अशोका या दोन ठिकाणी भलेमोठे खड्डे पडले असून त्यात माती मुरूम टाकून डागडुजी केली जाते. परंतु काही दिवसातच त्या ठिकाणी परिस्थिती ' जैसे थे' असल्यामुळे प्रशासन किती 'धिम्म' आहे ही बाब स्पष्ट होत आहे. प्रवशांना त्रास होऊ नये व लहान मोठे अपघात टाळण्यासाठी समाजसेवक बिलाल मोरबेकर, वाहतूक पोलीस नरेश मोरे आदींनी सदर खड्डे स्वतःहून बुजवून होणारे संभाव्य अपघातात टाळण्याचे प्रयत्न केले आहे. बिलाल मोरबेकर व नरेश मोरे यांनी केलेल्या सेवेबद्दल त्यांचे रोहयात सर्वत्र कौतुक होत आहे.

## ईद-ए-मिलादच्या निमित्ताने मुस्लिम समाजाच्यावतीने रक्तदान

**दै.रायगड नगरी । कर्जत**

ईद–ए–मिलाद च्या निमित्ताने मुस्लिम समाज कर्जत तर्फे भव्य रक्तदान शिबिर चे आयोजन करण्यात आले होते, यावेळी १२१ रक्तदात्यांनी केले रक्तदान करून आपला ईद सण साजरा केला व सामाजिक बांधिलकी जपली आहे.

जामा मस्जिद कर्जत येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, मुस्लिम समाज अध्यक्ष सैदु शेख यांनी उपस्थितांचे स्वागत केले,सय्यद मुश्ताक़ ईद्रूस यांनी सर्व प्रथम रक्तदान करून शिबिराचा शुभारंभ केला.रक्त संकलनाचे काम संकलन समर्पण रक्तपेढ़ी घाटकोपर चे डॉ.आखलाक शेख व त्यांची टीम यांनी केले त्यांना सार्वजनिक रक्तदाते राजाभाऊ कोठारी यांनी सहकार्य केले.

मुस्लीम समाजाचे सलीम मुजावर, नदीम खान, निसार शेख, अब्बास शेख, रशिद मुजावर, इस्माइल दीवान, नदीम कुरेशी, नवाज़ तांबोळी, हामिद खैराट, रमीज़ बिद्री, ज़हूर शेख़, इम्रान अनवर, अज़ीज़ शेख़, एजाज़ मुल्ला, सरताज खान, वहाब मुजावर, हैदर शेख, यूसुफ खान आदी उपस्थित होते. तसेच वेणगाव येथील श्री महालक्ष्मी देवस्थान अध्यक्ष रंजन दातार, भाजपचे सुनील गोगटे, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, सुनील सोनी, शिवसेनेचे नितिन सावंत, बाबू घारे, प्रभाकर करंजकर, जयवंत म्हसे, विनोद पांडे, प्रशांत उगले, अभिषेक सुर्वे, दिनेश कडू, कृष्णा जाधव, महेंद्र कांबळे, सुरेश सुर्वे, चेतन शाह, मोहन ओसवाल, इल्यास कर्जतवाला, रौनक कोठारी उपस्थित होते.

## भात शेतीचे भवितव्य पावसाच्या हाती ; परतीच्या पावसाची बळीराजाला चिंता

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात यंदाच्या वर्षी पावसाच्या हंगामातील दिवसात शेतात पेरणीच्या काळापासून पावसाची संततधार आणि कडक पडणारे ऊन यामुळे शेतकऱ्यांना दुबार पेरण्या करून, भात शेतीची लागवड करावी लागली होती. रोपांच्या झालेल्या नुकसानीमुळे भात शेतीचे भवितव्य राम भरोसे झाले होते. मात्र मध्यंतरीच्या काळात भात शेतीला पूरक असा पाऊस झाला. त्यामुळे भात शेतीला पोषक असे वातावरण मिळाले. त्यामुळे भात शेती उत्तम होऊ लागली. आणि काही दिवसातच शिवारात सोनेरी कणसे दिसू लागली आहेत.



मात्र परतीच्या पावसाची नजर या तयार झालेल्या भात पिकांना लागू लागल्याने शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्या सर्वत्र भातशेती कापणी योग्य होत आली आहे.तर काही प्रमाणात भात कापणीला सुरुवातही झाली आहे. शेतकऱ्यांनी लावलेले कर्जत जातीचे पिक तयार होण्याच्या स्थितीत आहे. मात्र पावसाच्या भितीने कापणीचे काम थांबविण्यात आले आहे. सद्यस्थितीत रत्ना, कोलम, गंगोत्री अशी भात पिके तयार होउन कापणी योग्य झाली आहेत.

मात्र परतीचा पाऊस सक्रिय झाल्याने कापणीच्या हंगामात बाधा आणत, भाताचे नुकसान करीत आहे. यावर्षी काही प्रमाणात रोगराई वगळता उत्तम भात शेती तयार झाली आहे. त्यामुळे शेतकरीही शिवारातील पिवळी झालेली भात पिके पाहून आनंदात असल्याचे सर्वत्र पाहायला मिळत आहे.

यावर्षी शिवारात सुंदर व भरघोस आलेल्या या भात पिकांचे परतीच्या पावसामुळे नुकसान होण्याची शक्यता शेतकरी व्यक्त करू लागला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास परतीचा पाऊस हिरावून घेतोय की काय ? अशी भिती शेतकऱ्यांसमोर लागून राहिली आहे.

## पनवेल महानगरपालिका

### ता.पनवेल, जि.रायगड

कार्यालय : आयुक्त मुख्यालय, २ रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल–४१०२०६, दूरध्वनी क्र. ०२२–२७४५८०४० / ४१ / ४२
Email Id : panvelcorporation@gmail.com

जा.क्र.पमपा/पर्यावरण/३९२२/प्र.क्र.६/१३७ दिनांक : / /२०२२

### जाहीर नोटीस

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात माझी वसुंधरा अभियान सन २०२३ ची अंमलबजावणीसाठी त्रयस्थ संस्थेची सल्लागार म्हणून नेमणूक करणेकामी तातडीने इच्छुक पुरवठा धारक / व्यक्ती यांचेकडून जाहीर निविदा मागवित आहेत.

संबंधितांनी त्यांची सिलबंद निविदा महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागात दिनांक १७/१०/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावीत. सदर तारखेनंतर आलेली निविदा विचारात घेतली जाणार नाहीत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | काम पूर्णत्वाचा कालावधी | अनामत रक्कम | निविदा प्रपत्रकाची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रात माझी वसुंधरा अभियान सन २०२३ ची अंमलबजावणीसाठी त्रयस्थ संस्थेची सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत. | रु.१०,००,०००/– | कार्यादेश दिल्यापासून २०२३ चे परिक्षण होईपर्यंत | रु.१०,०००/– | रु.५९०/– (GST सह) |

अटी व शर्ती :–

१) अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत, लाखोटा क्र.०१ मध्ये सादर करण्याचा आहे.

२) या कामी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा करून दि.१७/१०/२०२२ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत पर्यावरण विभागात उपलब्ध होईल.

३) जाहीर निविदा स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीधारक यांना राहतील.

सही/–
**(डॉ.प्रशांत रसाळ)**
अतिरिक्त आयुक्त–I
पनवेल महानगरपालिका